# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/ई-मेल/बातमी/२०२०　　　　　　　　　　दि.२३ जून,२०२०

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) राष्ट्रीय सेवा योजना विभाग, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, रासेयो विभागीय कार्यालय,पुणे आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'महामारीच्या काळात योगासने व प्राणायाम यांचे महत्व' या विषयावर रविवारी आंततरराष्ट्रीय ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन कोस्टारिका येथील योगतज्ज्ञ तसेच कोस्टारिकाच्या भारतातील दूत मारियाला क्रुज यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी रासेयोचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य अतुल सांळूखे होते. प्रमुख पाहूणे म्हणून प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर होते. रासेयो संचालक डॉ. पंकजकुमार नन्नवरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.माहुलीकर यांनी आपल्या भाषणात सद्याच्या काळात प्रत्येकाने रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यावर भर द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. पहिल्या सत्रात लोणावळा येथील योगतज्ज्ञ डॉ.मनमत घरोटे यांनी योगा व प्रतिकार शक्ती यावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात थायलंड येथील प्रा.डॉ.धिरावट यांनी कोरोनावर मात करण्याच्या उपाययोजना याची माहिती दिली. शेवटच्या सत्रात भुवनेश्वर येथील डॉ. सच्चिदानंद बेहरा यांनी टाळेबंदीच्या काळात रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी योगाचे महत्व यावर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचे सुत्रसंचालन डॉ. वैभव सबनिस यांनी केले. आभार डॉ. प्रवीण महाले यांनी मानले. श्रेया सबनिस, नितीन कापडीस व डॉ.प्रशांत कसबे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. भारतातून जवळपास दिड हजार रासेयो कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी स्वयंसेवक यांनी कार्यशाळेचा लाभ घेतला. झुम व फेसबुक याद्वारे ही ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

**बातीम क्र.२.**

जळगाव दि.२३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने रविवार दि.२१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस ऑनलाईन साजरा करण्यात आला.

यंदा "निरोगी कुंटुंबासाठी घरच्या घरी योगा" ही संकल्पना होती. झुम ॲप ऑनलाईनद्वारे प्रा.पंकज खाजबागे व श्रध्दा व्यास यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. प्र-कुलगुरू पी.पी.माहुलीकर यांनी मनोगतात योगाचे महत्व विशद केले. समन्वयक इंजि.राजेश पाटील यांनी योगा दिनाचे महत्व सांगुन स्वागत केले. सव्वा तासाच्या या कार्यक्रमाचा ५० पेक्षा अधिक लोकांनी लाभ घेतला.

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/ई-मेल/बातमी/२०२०                                        दि.१२ जून,२०२०

जळगाव दि.१२ (प्रतिनिधी) देशावर कोणतीही राष्ट्रीय आपत्ती आली असेल तर राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक तात्काळ धावून जातो. आजही ही कोविड-१९ अर्थात कोरोना काळात संपूर्ण देशभर रासेयोचा स्वयंसेवक शासनाच्या विविध उपक्रमांना हातभार लावण्यासाठी सक्रीय आहेत. असे गौरवोद्गार राष्ट्रीय सेवा योजना भारत सरकारचे संचालक सौरव शाह यांनी उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना काढले. कबचौउमवि विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रासेयो विभागीय कार्यालय,पूणे, रासेयो विभाग उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वेबिनारच्या उद्घाटन प्रसंगी श्री शाह बोलत होते.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा . पी .पी .पाटील, प्र-कुलगुरू पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य दिलीप पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ.अतुल साळुंके, पुणे गोवा राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय संचालक कार्तिकेयन, युवा अधिकारी अजय शिंदे, प्रभारी कुलसचिव डॉ .बी. व्ही. पवार, युनिसेफचे तानाजी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

दोन दिवस चालणाऱ्या ऑनलाईन वेबिनारच्या उदघाटन सत्रात राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळुंखे यांनी महाराष्ट्रातील राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका मांडताना आत्तापर्यंत स्वयंसेवकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याचा आढावा घेतला. सोबतच कोविड- १९ अर्थात कोरोना महामारी च्या काळात कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी केलेल्या कार्याचा गौरव केला. राष्ट्रीय सेवा योजनेचे पुणे गोवा विभागीय संचालक कार्तिकेयन यांनीही राज्यातील विविध विद्यापीठांच्या कार्याचा आढावा घेतला व वेबिनार आयोजनाबाबत विद्यापीठाचे कौतुक केले. तर विद्यापीठाच्यावतीने कुलगुरू डॉ. पी. पी .पाटील यांनी शुभेच्छा संदेश दिला. प्र-कुलगुरू माहुलीकर यांनी विद्यापीठाच्या वतीने या काळात राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केलेल्या कार्याचे कौतुक केले. विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील यांनीही कोरोनाच्या काळामध्ये स्वयंसेवकांनी सामाजिक भान ठेवून ही जबाबदारी पार पाडली असे सांगितले.

वेबिनारच्या दुसऱ्या सत्रात युनिसेफच्या डॉ .राजलखमी नायर यांनी आरोग्याच्या बाबतीत महत्वाची जनजागृती करताना स्वयंसेवकांनी आणि समाजाने या काळात घ्यावयाची जबाबदारी व आरोग्याच्या समस्यांबाबत असलेल्या उपाययोजना संदर्भात भूमिका मांडली तर युनिसेफचे डॉ. शैलेश पाटील यांनी कुपोषण, आयुष्यमान भारत, बेटी बचाव बेटी पढाव, भारत सरकारच्या योजना

यासंदर्भात युनिसेफच्या माध्यमातून चालणारे कार्य व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांच्या कार्याबाबत माहिती दिली. भुवनेश्वर येथील डॉ. एन .बी.खुंतीया यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिर काळात काय खबरदारी घेतली पाहिजे, सनेटायझर आणि सोशल डिस्टन्स याबाबतीतले उपाय योजना यावर भाष्य केले. सत्राच्या शेवटी जळगाव येथील डॉ .सतीश पाटील यांनी कोरोना काळात समाजावर होणारे मानसिकदृष्ट्या परिणाम काय आणि कसे आहेत त्यासाठी मानसोपचार आणि समुपदेशन याबाबतीत भूमिका मांडली. वेबिनारच्या या संपूर्ण काळात राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य सचिव डॉ. प्रवीण महाले, डॉ.वैभव सबनीस, नंदुरबार जिल्हा समन्वयक डॉ . माधव कदम, धुळे जिल्हा समन्वयक डॉ. वाल्मीक आढावे, जळगाव जिल्हा समन्वयक डॉ . विजय मांटे, जळगाव जिल्हा नोडल ऑफिसर डॉ. दिनेश पाटील, धुळे जिल्हा नोडल ऑफिसर डॉ .प्रशांत कसबे यांच्यासह तिनही जिल्ह्यातील विभागीय समन्वयक परिश्रम घेत आहेत .या राष्ट्रीय वेबिनार मध्ये देशभरातील विविध विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक, विविध पदाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक आणि समाजसेवेची आवड असणारे सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

---------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव**

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. 29 नोव्हेंबर, २०१९

जळगाव दि.२9 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व उत्कृष्ट विद्यार्थी स्वयंसेवकांना शुक्रवारी, २९ नोव्हेंबर रोजी कार्यगौरव पुरस्कार वितरित करण्यात आले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. यावेळी केशव स्मृती प्रतिष्ठानचे सचिव, रत्नाकर पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य, दिलीप पाटील, प्रा.नितीन बारी हे उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते रासेयो स्वयंसेवक कार्यदिनदर्शिकाचे प्रकाशन करण्यात आले. रत्नाकर पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगीतले की, सेवेचा वसा हा आपल्या कृतीतून प्रदर्शीत व्हावा. सामाजिक परिवर्तनाचा रथ रासेयोच्या माध्यमातून पुढे न्यावा. समाजातील समस्या रासेयो स्वयंसेवकांनी जाणून समाजामध्ये परिवर्तन घडवून आणावे. दिलीप पाटील यांनी सांगीतले की, युवाशक्तीच्या मनाला साद घातली तर अनेक विधायक कार्य करता येतात. रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी स्वयंसेवकातील सुप्त गुण ओळखावेत. प्रा.नितीन बारी यांनी स्वयंसेवाकांना उद्देशून सांगितले की, तुमच्यातील कौशल्य रासेयोच्या माध्यमातून काम करतांना उपयोगात आणावे. अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी रासेयोच्या माध्यमातून विधायक काम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दिपक सोनवणे यांनी केले. प्रास्ताविक रासेयो संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी केले. प्रा. माधव कदम यांनी आभार मानले.

पुरस्कारार्थी प्राचार्य , डॉ.मनोहर पाटील, डॉ.कांचन महाजन व कांचन चव्हाण यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

**पुरस्कार विजेते पुढील प्रमाणे विद्यापीठस्तरीय महाविद्यालयीन** रासेयो एकक उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार **जळगाव जिल्ह्यासाठी** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव, **धुळे जिल्ह्यासाठी** एस.एस.व्ही.पी.एस.चे डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे तर **नंदुरबार जिल्ह्यासाठी** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. **विद्यापीठस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी** उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार **जळगाव जिल्ह्यातून** डॉ.कांचन महाजन, कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगाव, **धुळे जिल्ह्यातून** डॉ.दत्ता ढाले, एस.एस.व्ही.पी.एस.चे डॉ.पी.आर.घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे , **नंदूरबार जिल्ह्यातून** डॉ.नामदेव गजरे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रूपये १०००/- देऊन गौरविण्यात आले. **विद्यापीठस्तरीय रासेयो स्वयंसेवक** उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार **जळगाव जिल्हयातून** कांचन चव्हाण, समाजशास्त्र प्रशाळा, समाजकार्य विभाग,कबचौउमवि,जळगाव, **धुळे जिल्ह्यातून** गणेश उफाडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय, मोरणे,जि.धुळे, **नंदुरबार जिल्ह्यातून** अनिल गावित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,नवापूर,जि.नंदूरबार यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रूपये ५००/- देऊन गौरविण्यात आले.

सकाळी झालेल्या कार्यशाळेत जैवविविधता व्यवस्थापन समिती (बीएमसी) व नोंदवही (पीबीआर) यावर डॉ.के.एस.विश्वकर्मा यांनी तर डॉ.संजय पहुरकर यांनी रेडरिबन क्लब व एड्स जगजागृती अभियानाबाबत मार्गदर्शन केले. डॉ.विवेक काटदरे यांनी हिशोब तपासणीबाबत मार्गदर्शन केले.

--------------------------------------------------------------------------------------------

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

**बातमी क्र.१**

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. २५ सप्टेबर, २०१९

**बातमी क्र.१**

जळगाव दि.२५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना पदवी व पदव्युत्तर एकक व समाजकार्य विभाग रासेयो एककाच्या वतीने प्लास्टिक मुक्त विद्यापीठ परिसर संकल्प रॅलीचे आयोजन दि.२४ सप्टेबर रोजी करण्यात आले.

विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेपासून रॅलीस दुपारी ४:३० वाजता सुरुवात होऊन समाजशास्त्रप्रशाळा, संगणकशास्त्र प्रशाळा,गणित व संख्याशास्त्र प्रशाळा, भाषा अभ्यास प्रशाळा, दुरशिक्षण विभाग मार्गे पर्यावरणशास्त्र प्रशाळा, जीवशास्त्र प्रशाळा, युआयसीटी प्रशाळा येथून विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीच्या प्रवेशद्वारा दाखल झाली. रॅलीचा समारोप मा.प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, कुलसचिव बी.बी.पाटील, प्रोफेसर व्ही.एल.माहेश्वरी, प्रोफेसर एस.टी.इंगळे, रासेयो संचालक डॉ. पंकजकुमार नन्नवरे या मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी पथनाट्यकार विनोद ढगे व त्यांच्या सहकार्यांनी प्लस्टिक मुक्ति, स्वच्छता, साफ-सफाई यावर पथनाट्य सादर केले. डॉ.नन्नवरे यांनी स्वयंसेवकाकडून प्लस्टिक मुक्तिचा संकल्प वाचून घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.सुनील कुलकर्णी, प्रा.दिपक सोनवणे, डॉ.चिंतामन आगे, डॉ.पवित्रा पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

---------------------------------------------------------------------------------------------------

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. २६ सप्टेंबर, २०१९

जळगाव दि.२६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे राष्ट्रीय सेवा योजना मुख्य व सहायक कार्यक्रम अधिकारी, जिल्हा समनव्यक यांच्यासाठी नियोजन व अंमलबजावणी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन गुरुवार दि.२६ सप्टेंबर रोजी विद्यापीठात करण्यात आले.

कार्यशाळेचे उदघाटन प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर यांच्या अध्यक्षतेखाली प्राचार्य डॉ.अतुल साळुंखे, राज्य संपर्क अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी एस.आर.गोहिल यांच्या प्रमुख उपस्थित झाले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी घडत असतो. तेव्हा सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी यांनी आपली जबाबदारी चोख बजावली पाहिजे. महाराष्ट्रात सांगली व कोल्हापूर येथे उदभवलेल्या पूर परिस्थितीच्या वेळी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ रासेयो एककाचे स्वयंसेवकांनी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे नमूद करुन कुलगुरु प्रा.पी.पी. पाटील यांचे विशेष आभार मानले. डॉ. साळूंखे या वेळी बोलत होते. त्यांनी पुढे असे सांगीतले की, २०२० मध्ये राज्यस्तरीय आव्हान स्पर्धेचे आयोजन कबचौउमवि जळगाव येथे करण्यात येईल. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरु प्रा. माहूलीकर यांनी विद्यापीठाचा परिसर स्वच्छ व सुंदर असण्यामागे रासेयोच्या स्वयंसेवकांचा मोठा वाटा आहे. रासेयोद्वारा विद्यार्थ्यांमध्ये प्रगल्भता येते. नवीन शिक्षणप्रणालीत रासेयोद्वारा कौशल्यपूर्ण विद्यार्थी घडविण्यासाठी विशेष भर देण्यात आला आहे. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना भुसावळ विभागीय कार्यक्रम समन्वयक डॉ. सोपान बोराटे लिखित एन.एस.एस.साठी या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी तर सुत्रसंचालन प्रा.विजय मांटे यांनी केले. डॉ.माधव कदम यांनी आभार मानले.

सकाळच्या सत्रात रासेयो हिशेब नोंदी, देयके विवरण व लेखे तयार करण्याच्या पध्दतीवर सनदी लेखापाल ए.आय.कोठारी यांनी मार्गदर्शन केले. हिशोब तपासणी व अदायगीबाबत प्रभारी वित्त व लेखा अधिकारी सोमनाथ गोहिल यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ.अतुल साळूंखे यांनी रासेयो चळवळ काय आहे याबाबत मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात विविध उपक्रमांचा अहवाल सादर करण्याच्या पध्दती यावर डॉ.पंकजकुमार नन्नवरे, डॉ.माधव कदम आणि डॉ. वाल्मिक आढावे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संजय पत्की,संगीत विभाग यांनी रासेयो गीत चाल व सादरीकरण केले. विनोद ढगे यांनी स्वच्छता ही सेवा २०१९ अंतर्गत प्लास्टिक मुक्तीवर पथनाट्य सादर केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. २६ सप्टेंबर, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू
(प्रमोद आ.चव्हाण)
जनसंपर्क अधिकारी यांच्या करीता

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. २८ सप्टेंबर, २०१९

जळगाव दि.२८ ( ) राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे राज्य संपर्क अधिकारी प्राचार्य डॉ. अतुल साळूंखे व सह-समन्वयक डॉ. कार्तिकियन यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना पदवी व पदव्युत्तर विभाग विद्यापीठ एककातील स्वयंसेकाशी संवाद साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय व राज्यपातळीवर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती स्वयंसेवकांना दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यापीठ एककाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ.सुनील कुलकर्णी यांनी "ध्यास एक साधका अंतरात ठेव तु" हे सामुहिक गीत घेऊन संवाद कार्यक्रमाच्या सुरवात केली. प्रास्तविक विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी केले. संवाद कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमास सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ.चिंतामण आगे व विद्यापीठातील विविध प्रशाळेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

----------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. २८ सप्टेंबर, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. 30 सप्टेंबर, २०१९

जळगाव दि.30 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संबंध हेल्थ फाऊंडेशन गुरुग्राम यांच्या सहकार्याने आयोजित कार्यशाळेत रासेयोच्या स्वयंसेवकांनी कुलगुरु प्रा. पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तंबाखु मुक्त जीवन अभियानासाठीचा संकल्प् व्यक्त् केला.

सोमवार, दि.३० सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात तंबाखु मुक्त जीवन अभियानाकरिता युवक कार्यशाळा घेण्यात आली. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उदघाटन समारंभास प्रमुख अतिथी म्हणून व्यु.प.सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, संबंध हेल्थ् फाऊंडेशनचे विश्वस्त् संजय सेठ, वरिष्ठ प्रकल्प् व्यवस्थापक डॉ.सोमिल रस्तोगी, कर्करोग तज्ज्ञ डॉ.गोविंद मंत्री, देविदास शिंदे आणि रासेयोचे संचालक डॉ.पंकज कुमार नन्नवरे उपस्थित होते.

महाराष्ट्रात तंबाखु सेवनाने जडावलेल्या आजारांनी दरवर्षी ७५ हजार लोक बळी जातात. तर दर दिवशी ५३० लहान मुले तंबाखुचा वापर करीत असल्याचे भयानक चित्र आहे. बळीचा हा वाढता आलेख रोखण्यासाठी प्लेज फॉर लाईफ तंबाखुमुक्त युवापिढी या तंबाखु विरोधी राष्ट्रीय अभियानाची कबचौउमवित सुरुवात होत आहे. यावेळी बोलतांना कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील रासेयोच्या स्वयंसेवकांनी ग्रामीण भागात तंबाखु मुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती करुन सुदृढ भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे असे आवाहन केले.

डॉ.गोविंद मंत्री यांनी तंबाखुचे व्यसन सामान्य् वर्गात अधिक प्रमाणात असून महाराष्ट्रात ३१ टक्के लोकसंख्या कोणत्या ना कोणत्या व्यसनाला बळी पडलेली असल्याचे नमूद केले. शालेय पातळीवर विद्यार्थ्यांना आकर्षण म्हणून व्यसन लागते. ते पुढे वाढते. आपल्या व्यसनाचे अनेक जण समर्थन करुन स्व्त:ची दिशाभूल करित असतात. व्यसनापासून परावृत्त् करण्यासाठी लोकांची मानसिकता बदलणे गरजेचे असल्याचे डॉ.मंत्री यांनी सांगितले. यावेळी कॅन्स्र ग्रस्त् श्री.विलास जैन यांनी आपले अनुभव कथन केले. मनाचा ताबा ठेवून व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा सहभाग हा सामाजिक कार्यात महत्त्वाचा ठरत असल्याचे सांगितले. यावेळी डॉ.सोमिल रस्तोगी यांनी मनोगत व्यक्त् केले. संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुनील कुलकर्णी यांनी केले. समन्व्यक डॉ.संतोष खिराडे यांनी आभार मानले. यावेळी सभागृहाबाहेर तंबाखु मुक्तीचे पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी तंबाखु मुक्तीची सामुहिक शपथ दिली. उदघाटनानंतरच्या सत्रात संबंध हेल्थ् फाऊंडेशनकडून तंबाखु मुक्ती अभियानाची माहिती देण्यात आली. सायंकाळी विनोद ढगे व त्यांच्या सहकार्यांनी व्यसनमुक्तीवरील पथनाटय सादर केले.

------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. ३० सप्टेबर, २०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

------------------------------------------------------------------------------------------------------

बातमी क्र. २

जळगाव दि.३० ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ऑक्टोबर / नोव्हेंबर मधील विविध परीक्षा विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमुळे आता १ नोव्हेंबर पासून होणार आहेत. या पूर्वी १७ ऑक्टोबर पासून या परीक्षा सुरु होणार होत्या.

महाराष्ट्र राज्य् विधानसभेचा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर झाला असून विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना निवडणुक प्रक्रियेच्या अनुषंगाने कामकाज सोपविण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीचे मतदान २१ ऑक्टोबर रोजी होणार असल्यामुळे दिनांक १९ ते २२ पर्यंत शिक्षक व कर्मचारी निवडणुक कामकाजात व्यस्त् आहेत या दरम्यान परीक्षांचे आयोजन करणे शक्य् होणार नाही.

यापूर्वी १७ ऑक्टोबर पासून या परीक्षा आयोजित करण्याचे नियोजन होते. तसेच दिपावलीच्या सुटयांमुळे २५ ते ३१ ऑक्टोबर परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले नव्हते. तथापि, विधानसभा निवडणुक लक्षात घेता विद्यापीठाने १७ ऑक्टोबर ऐवजी १ नोव्हेंबर पासून परीक्षा आयोजित करण्याचे निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिध्द करण्यात येत आहे. याची संबंधित विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षक व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी केले आहे.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. 30 सप्टेंबर, २०१९

जळगाव दि.30 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने संबंध हेल्थ फाऊंडेशन गुरुग्राम यांच्या सहकार्याने आयोजित कार्यशाळेत रासेयोच्या स्वयंसेवकांनी कुलगुरु प्रा. पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तंबाखु मुक्तजीवन अभियानासाठीचा संकल्प व्यक्त केला.

सोमवार, दि.३० सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात तंबाखु मुक्त जीवन अभियानाकरिता युवक कार्यशाळा घेण्यात आली. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उदघाटन समारंभास प्रमुख अतिथी म्हणून व्य.प.सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, संबंध हेल्थ फाऊंडेशनचे विश्वस्त संजय सेठ, वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक डॉ.सोमिल रस्तोगी, कर्करोग तज्ज्ञ डॉ.गोविंद मंत्री, देविदास शिंदे आणि रासेयोचे संचालक डॉ.पंकज कुमार नन्नवरे उपस्थित होते.

महाराष्ट्रात तंबाखु सेवनाने जडावलेल्या आजारांनी दरवर्षी ७५ हजार लोक बळी जातात. तर दर दिवशी ५३० लहान मुले तंबाखुचा वापर करीत असल्याचे भयानक चित्र आहे. बळीचा हा वाढता आलेख रोखण्यासाठी प्लेज फॉर लाईफ तंबाखुमुक्त युवापिढी या तंबाखु विरोधी राष्ट्रीय अभियानाची कबचौउमवित सुरुवात होत आहे. यावेळी बोलतांना कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील रासेयोच्या स्वयंसेवकांनी ग्रामीण भागात तंबाखु मुक्त अभियानाअंतर्गत जनजागृती करुन सुदृढ भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे असे आवाहन केले.

डॉ.गोविंद मंत्री यांनी तंबाखुचे व्यसन सामान्य् वर्गात अधिक प्रमाणात असून महाराष्ट्रात ३१ टक्के लोकसंख्या कोणत्या ना कोणत्या व्यसनाला बळी पडलेली असल्याचे नमूद केले. शालेय पातळीवर विद्यार्थ्यांना आकर्षण म्हणून व्यसन लागते. ते पुढे वाढते. आपल्या व्यसनाचे अनेक जण समर्थन करुन स्वत:ची दिशाभूल करित असतात. व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी लोकांची मानसिकता बदलणे गरजेचे असल्याचे डॉ.मंत्री यांनी सांगितले. यावेळी कॅन्सर ग्रस्त श्री.विलास जैन यांनी आपले अनुभव कथन केले. मनाचा ताबा ठेवून व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कुलसचिव भ.भा.पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा सहभाग हा सामाजिक कार्यात महत्त्वाचा ठरत असल्याचे सांगितले. यावेळी डॉ.सोमिल रस्तोगी यांनी मनोगत व्यक्त केले. संचालक डॉ.पंकजकुमार नन्नवरे यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुनील कुलकर्णी यांनी केले. समन्वयक डॉ.संतोष खिराडे यांनी आभार मानले. यावेळी सभागृहाबाहेर तंबाखु मुक्तीचे पोस्टर प्रदर्शन भरविण्यात आले होते. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी तंबाखु मुक्तीची सामुहिक शपथ दिली. उदघाटनानंतरच्या सत्रात संबंध हेल्थ फाऊंडेशनकडून तंबाखु मुक्ती अभियानाची माहिती देण्यात आली. सायंकाळी विनोद ढगे व त्यांच्या सहकार्यांनी व्यसनमुक्तीवरील पथनाटय सादर केले.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. 10 ऑक्टोबर, २०१९

जळगाव दि.10 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मतदार जनजागृती अभियाना अंतर्गत गुरुवार, दि. 10 ऑक्टोबर, २०१९ रोजी निवडणूक निरीक्षक डॉ. पार्थ सारथी मिश्रा (आयएएस, ओरिसा) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यापीठाच्या अधिसभा गृहात झालेल्या या कार्यक्रमात डॉ. मिश्रा यांनी लोकशाहीत मतदानाचे महत्त्व अधिक असून प्रत्येक मतदाराने मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थ्यांना मतदान प्रतिज्ञा देण्यात आली. मंचावर प्र-कुलगुरु प्रा. पी.पी. माहुलीकर, कुलसचिव भ.भा. पाटील, संचालक डॉ. सत्यजित साळवे, डॉ. पंकजकुमार नन्नवरे, प्रा. उमेश गोगडीया आदी उपस्थित होते. मिलींद बागुल यांनी प्रतिज्ञा दिली. प्रा. दिपक सोनवणे यांनी सूत्र संचलन केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/बातमी/हस्तदेय/२०१९ दि. 10 ऑक्टोबर, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. सुनिल पाटील)
जनसंपर्क अधिकारी